कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गातील अभियंत्यांची बदली.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांक: बदली २०१८/प्र.क्र.३५/२०१८/आ.(शा.अ.)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२६ एप्रिल, २०१८.

आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) आणि ४(५) मधील तरतुदीनुसार, मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई व मुख्य अभियंता(वि.प्र.), जलसंपदा विभाग, पुणे अंतर्गत कार्यरत असलेल्या खाली नमुद कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता संवर्गातील अभियंत्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार (स्तंभ ४ नुसार) सार्वजनिक सेवेच्या हितार्थ बदली करण्यात येत आहे.

अ.क्र.	अभियंत्याचे नाव	कार्यरत असलेले ठिकाण	बदलीचे ठिकाण
१	२	३	४
१)	श्री.सुनिल बाळोजी सरफळे, कनिष्ठ अभियंता.	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई अंतर्गत अ.अ., रत्नागिरी पाटबंधारे मंडळ, रत्नागिरी अंतर्गत पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, चिपळूण अंतर्गत गडनदी प्रकल्प उपविभाग कुचांबे.	मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई अंतर्गत अ.अ., ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे अंतर्गत रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड अंतर्गत रिक्त पदी.
२)	श्री.दत्तात्रय शंकर कोकणे, शाखा अभियंता	मुख्य अभियंता(वि.प्र.), जलसंपदा विभाग, पुणे अंतर्गत अ.अ., कुकडी सिंचन मंडळ, पुणे अंतर्गत कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगांव अंतर्गत कुकडी पाटबंधारे उपविभाग क्र.२, नारायणगांव अंतर्गत मीना सिंचन शाखा, शिरोली.	मुख्य अभियंता (वि.प्र.), जलसंपदा विभाग, पुणे अंतर्गत अ.अ., कुकडी सिंचन मंडळ, पुणे अंतर्गत कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगांव अंतर्गत कुकडी पाटबंधारे उपविभाग क्र.३, मंचर अंतर्गत मंचर पाटबंधारे शाखा, मंचर येथील रिक्त पदी.

२. आदेशात नमूद अभियंत्यांची ज्या कार्यालयात बदली करण्यात आली आहे, त्या कार्यालयाच्या संबंधित कार्यकारी संचालक/मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांनी उपरोक्त आदेशातील स्तंभ-४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित अभियंत्यांचे सविस्तर पदस्थापनेचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

३. आदेशात नमूद अभियंता ज्या कार्यालयात कार्यरत आहेत, त्या कार्यालयाच्या संबंधित कार्यकारी संचालक /मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता यांना कळविण्यात येते की, त्यांनी बदली झालेल्या संबंधित अभियंत्यांचे सविस्तर पदस्थापनेचे आदेश निर्गमित झाल्यानंतरच बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी त्यांना त्वरित कार्यमुक्त करावे. सविस्तर पदस्थापनेचे आदेश प्राप्त झाल्याशिवाय कार्यमुक्त केल्यास व रिक्त पदा अभावी आदेश कार्यान्वित करण्यास अडचणी उद्भवल्यास संबंधित अभियंत्यांना सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करावा लागतो. अशा प्रकरणी संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४. संबंधित कार्यकारी संचालक /मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांना कळविण्यात येते की, शासन स्तरावरील प्रस्तुत आदेश प्रथम कार्यान्वित करुन तद्नंतरच क्षेत्रीय स्तरावरील प्रदेशांतर्गत बदल्यांचे आदेश कार्यान्वित करावेत. शासनाने केलेल्या आदेशात क्षेत्रीय स्तरावर कोणतेही बदल करण्यात येऊ नयेत. पदस्थापनेच्या ठिकाणी पद रिक्त नसेल अथवा अन्य कारणांमुळे बदली कार्यान्वित करण्यास प्रशासकीय अडचण उद्भवत असेल तर, अशा बाबतीत शासनास तात्काळ अवगत करुन अहवाल सादर करावा.

५. संबंधित कार्यकारी संचालक /मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांना कळविण्यात येते की, त्यांनी वरीलप्रमाणे संबंधित कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांच्या बदलीची अंमलबजावणी करताना सदर बदलीच्या ठिकाणी कोणत्याही परिस्थितीत मंजूर पदांपेक्षा जास्त कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता कार्यरत राहणार नाहीत, याची सर्वार्थाने दक्षता घ्यावी.

६. वरीलप्रमाणे बदली करण्यात येत असलेल्या कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता यांच्या कार्यमुक्ती आदेशासोबत त्यांचे गोपनीय अहवाल, सेवापुस्तक, तसेच अंतिम वेतन प्रमाणपत्र बदली करण्यात आलेल्या नवीन कार्यालयाकडे तात्काळ पाठविण्यात यावे.

७. सदरहू बदली ही विनंती बदली असल्याने संबंधित अभियंत्यांना बदली विषयक प्रवासभत्ता व इतर अनुषंगिक लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

८. सदरचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४२६१७३७१४०२२७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Arvind Vitthalrao Pagar

Digitally signed by Arvind Vitthalrao Pagar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e73e74e98305e43eb295d08ba37550053b948b587f77b90efdc8b9ff16d8e158, serialNumber=3c4bfae11cba198118c1c28e0ff34686b6c0a82a270584a7daed60418b2f32ca, cn=Arvind Vitthalrao Pagar
Date: 2018.04.26 17:40:24 +05'30'

(अरविंद पगार)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- १) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
३) प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
५) कार्यकारी संचालक,महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे.
६) कार्यकारी संचालक,कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ,ठाणे.
७) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई.
८) मुख्य अभियंता(वि.प्र), जलसंपदा विभाग, पुणे.
९) अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे.
१०) अधीक्षक अभियंता, रत्नागिरी पाटबंधारे मंडळ, रत्नागिरी.
११) अधीक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, पुणे.
१२) स.स.(प्रशा.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३) कार्यासन आ. (शा.अ.) संग्रहार्थ.